वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती.
**विभागीय स्तरावर तपासणी समिती नेमण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
## शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-१०१२/(१५/१२)/भाग-२/माशि-५

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: २४ जुलै, २०१३.

वाचा -

**१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:वैखप्र-२०११/प्र.क्र.३३३/११/राकावि-२, दिनांक १६.११.२०११.**

**२) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण-१९१०/५५१/१०/प्राशि-३, दिनांक ०४.१०.२०१०.**

**३) शालेय शिक्षण व सेवायोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक:एसएसएन-२०८९/३/माशि-२, दिनांक १२.०५.१९८९.**

प्रस्तावना -

राज्यातील शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी लागू असलेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती योजनेच्या धर्तीवर शालेय शिक्षण विभागांतर्गत शासकीय व खाजगी अनुदानित शाळांमधील काम करणा-या शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती योजना राबविण्यात येत आहेत. शालेय शिक्षण विभागाने या योजनेमध्ये वेळोवेळी सुधारणा केली आहे. (उदा :- शालेय शिक्षण विभाग आदेश, दिनांक ४ ऑक्टोबर, २०१० व दिनांक ३ फेब्रुवारी, २०१२)

२. सध्या राबविण्यात येणा-या योजनेच्या ठळक बाबी खालीलप्रमाणे आहेत

(i) शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची देयके संबंधित शाळेकडून शिक्षणाधिका-याकडे पाठविली जातात.

(ii) वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची देयके रुपये १, ००,०००/- पर्यंत असतील तर मंजूरी देण्याचे अधिकार शिक्षणाधिकारी यांना आहेत. मात्र रुपये १, ००,०००/- वरील रक्कमेस मंजूरी देण्याचे अधिकार शासनाला आहेत.

३. विभागाने अवलंबविलेल्या वरील पध्दतीबाबत शासनाकडे अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. उदाहरण म्हणून:-

(i) वैद्यकीय देयके तपासण्याकरिता विभागीय उपसंचालक व मंत्रालय स्तरावर शिक्षण विभागाची कसलीही तांत्रिक यंत्रणा नाही. म्हणून क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी प्रमाणित करतात त्या आधारे वैद्यकीय देयके अदा केली जातात.

(ii) सचिवांचे किंवा शिक्षणाधिका-यांच्या स्तरावर तांत्रिक तपासणी होत नसल्याने बोगस प्रकरणे असण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत विधानमंडळामध्ये तारांकित व अतारांकित प्रश्न वारंवार विचारण्यात आलेले आहेत. या प्रकरणी काही कर्मचा-यांनी रुपये १,००,०००/- पर्यंत अनेक वैद्यकीय देयके तयार करुन वेळोवेळी पारीत करुन घेतल्याचे उघडकीस आले आहे.

४. वरील तक्रारी लक्षात घेता योग्य त्या उपाययोजना करण्याची बाब शासनाच्या अनेक दिवसांपासून विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन विभागीय शिक्षण उपसंचालकांच्या स्तरावर देयकाची तपासणी करण्याकरिता एक समिती गठीत करण्याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

## <u>शासन निर्णय -</u>

१. रुपये १,००,०००/- रक्कमेवरील देयके शिक्षणाधिकारी यांनी संबंधित शिक्षण उपसंचालक यांच्याकडे सादर करावीत.

२. विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी त्यांच्या विभागामधून प्राप्त झालेले सर्व प्रस्ताव तपासणीसाठी व शिफारशीसाठी खालील समितीसमोर सादर करावेत.

| | | |
|---|---|---|
| १. | विभागीय उपसंचालक, आरोग्य | अध्यक्ष |
| २. | उपसंचालक, लेखा व कोषागारे | सदस्य |
| ३. | विभागीय उपसंचालक, शिक्षण | सदस्य सचिव |

३. वरील समितीने त्यांच्यासमोर आलेल्या सर्व प्रस्तावांची नियमानुसार तपासणी / छाननी करुन योग्य ती शिफारस शासनाला करावी. प्रस्ताव परिपूर्ण नसेल किंवा त्यामध्ये त्रुटी असेल तर ते शिक्षणाधिका-यांकडे पूर्ततेसाठी परत करण्यात यावेत.

४. विभागीय समितीने शिफारस केलेल्या प्रस्तावांवर शासन योग्य तो निर्णय घेईल.

५. सदर शासन निर्णय मा.मुख्य सचिव यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०७२४१२३६२०२९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prakash Krishnrao Thube

Digitally signed by Prakash Krishnrao Thube
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Prakash Krishnrao Thube
Date: 2013.07.24 16:42:36 +05'30'

**प्रकाश ठुबे**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२) मा.अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा.अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा.अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
६) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
७) मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
८) मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
९) मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
१०) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
११) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
१३) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
१४) संचालक, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
१५) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
१६) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१७) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद.
१८) सर्व शिक्षण निरिक्षक (पश्चिम/ उत्तर/ दक्षिण), बृहन्मुंबई.
१९) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
२०) सर्व उपसंचालक, आरोग्य सेवा.
२१) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
२२) सर्व उपसंचालक, लेखा व कोषागारे.
२३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई.
२४) शालेय शिक्षण व क्रिडा विभागातील सर्व सहसचिव / उपसचिव
२५) निवड नस्ती / माशि-५, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.